अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १४ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १६५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## बुमराहला मागे टाकत अश्विन बनला नंबर १ गोलंदाज



**मुंबई :** भारतीय ऑफ स्पीनर गोलंदाज रविचंद्रन अश्विन आयसीसी टेस्ट रँकिंगमधील पहिल्या क्रमांकाचा गोलंदाज ठरला आहे. आयसीसीने बुधवारी जारी केलेल्या ताज्या रँकिगमध्ये टेस्ट गोलंदाजांच्या यादीत रविचंद्रन अश्विन अव्वल ठरला आहे.

जसप्रीत बुमराहला मागे टाकत अश्विन सहाव्यांदा नंबर १ टेस्ट गोलंदाज ठरला आहे. काही दिवसांपूर्वी धर्मशालामध्ये खेळल्या गेलेल्या कसोटी मालिकेत अश्विनने ५०० विकेट घेण्याचा विक्रम केला आहे. रविचंद्रन अश्विनने अलिकडेच धर्मशालामध्ये इंग्लंड विरुद्धचा १०० वा टेस्ट सामना खेळला. या सामन्यात अश्विनने धमाकेदार खेळी केली होती. १०० व्या टेस्ट सामन्यात अश्विनने कसोटीच्या पहिल्या डावात ५१ धावांत ४ बळी घेतले तर दुसऱ्या डावात ७७ धावांत ५ फलंदाज बाद केले. भारताने हा सामना एक डाव आणि ६२ धावांनी जिंकून मालिका ४-१ ने जिंकली. आयसीसी टॉप १० टेस्ट गोलंदाजांमध्ये तीन भारतीय गोलंदाजांचा समावेश आहे. त्याच्या नंतर दुसऱ्या स्थानावर ८४७ पॉईंट्ससह हेजलवुड आणि तिसऱ्या स्थानावर बुमराह असून त्याच्याकडे ८४७ पॉईंट्स आहेत.

# उमेदवारीचं मैदान मारलं फलटणच्या सिंहानं

- माढ्याच्या आखाड्यात पुन्हा नाईक-निंबाकरच
- फलणटकरांना भाजपाची दुसऱ्यांदा उमदेवारी
- पक्षांतर्गत विरोधकांवर सभ्यतेने मात
- उमेदवारीच्या रस्सीखेचीत अकलूजचे सिंह पिछाडीवर
- विकासकामं, भाजपा श्रेष्ठींचं प्रेम, विरोधकांना आपलसं करण्यानं रणजितसिंहांच्या नावावर उमेदवारी उमटली मोहर

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**माढ्याचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना भाजपानं या मतदार संघातून लोकसभेसाठी पुन्हा उमेदवारी बहाल केली आहे. दरम्यान, या मतदार संघामधील उमेदवारीच्या अत्यंत अटीतटीच्या रस्सीखेचमध्ये अकलूजकर मोहिते-पाटील सिंह पिछाडीवर राहिल्याचे स्पष्ट झाले. विद्यमान खासदार नाईक-निंबाळकर यांनाच उमदेवारी मिळणार याबाबत स्पष्टता होती, तरीपण उमेदवारीवरून मोहिते-पाटील यांनी आव्हानाचे रान पेटविले होते. यादरम्यान उमेदवारीचा संघर्ष राजधानी मुंबईसह दिल्ली भाजपा दरबारी धडकला होता. मात्र, भाजपानं नाईक-निंबाळकर यांच्या नावावर उमदेवारीची मोहर उमटवून अखेर उमेदवारीच्या संघर्षावर पडदा टाकला.**

पाणी आणि रस्ते या दोन गोष्टींवर विशेष लक्ष केंद्रित करुन खासदार नाईक-निंबाळकर यांनी साडेचार वर्षात भरीव कामे केली.मुख्य जलसिंचनाच्या योजनांसह रस्ते आणि अन्य अशा साधारण एक लाख कोटींच्या विकास कामांचा डोंगर रचला. निरा देवघर प्रकल्पाचे विस्तारीकरण, सांगोला उपसा सिंचन योजना, सोलापूर जिल्ह्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याची कृष्णा फ्लड डायव्हर्जन योजना, मुंबई-हैदराबाद बुलेट ट्रेन, फलटण-पंढरपूर रेल्वे, खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना, महाबळेश्वरच्या पायथ्याशी नव्या धरणाची निर्मिती आदी मोठ्या संख्येचे सिंचन प्रकल्प तसेच पालखी महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग आदींसाठी नाईक-निंबाळकरांनी सतत पाठपुरावा ठेवला. हाच पाठपुरावा त्यांना उमेदवारीपर्यंत घेऊन गेला. विकास कामं हा तर नाईक-निंबाळकरांना दुसऱ्यांदा उमेदवारी मिळण्याचा मुख्य बेस ठरलाच. पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पर्यंतचा थेट संबंध. शिवाय अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध



**मोहिते-पाटलांच्या भूमिकेकडे लक्ष :** नाईक-निंबाकर यांना उमेदवारी निश्चित झाल्यानंतर मोहिते-पाटील यांचे काय? हा मुद्दा महत्वाचा आहे. कोणत्याही परिस्थितीत लोकसभा लढायचीच असा मोहिते-पाटील यांच्यासह त्यांची समर्थकांनी चंग बांधला आहे. भाजपानं उमेदवारी नाकारल्यानंतर मोहिते-पाटील हे अपक्ष लढतात की शरद पवार राष्ट्रवादी गटाकडून लढतात हे पाहणे महत्वाचे आहे. माढ्याची जागा रासपला देण्याची भूमिका शरद पवारांनी बोलून दाखविली आहे. महादेव जानकर यांनी येथूल लढण्याची तयारी दशर्वली आहे. तथापि, नाईक-निंबाळकरांना उमेदवारी देताना भाजपाने मोहिते-पाटीलांसाठी काय पर्याय ठेवला, याला महत्व आहे. रात्री उशीरापर्यंत मोहिते-पाटलांची भूमिका समजू शकली नाही, मात्र त्यांच्या समर्थकांच्या ग्रुपवर आव्हानात्मक पोस्टचा पाऊस पडत होता.

> **“मतदार संघातील सर्वांच्या बळावर खासदार झालो. खासदार झालो म्हणून पुढे या मतदारसंघात साधारण १ लाख कोटींच्या विकास कामांचा डोंगर उभा केला. यामुळेच दुसऱ्या इनिंगच्या उमेदवारीचा मार्ग मोकळा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, विजयसिंह मोहिते-पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, आ.जयकुमार गोरे, राम सातपुते, राजेंद्र राऊत, बबनराव शिंदे, संजयमामा शिंदे, माजी आमदार प्रशांत परिचारक, जयवंतराव जगताप, दिलीप येळगावकर, नारायण पाटील, दीपक साळुंखे-पाटील, रश्मी बागल आदींमुळे उमेदवारी मिळाली. त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो.**
> **- रणजितसिंह नाईक-निंबाळकर, खासदार माढा”**

हे महत्वाचे ठरले. शिवाय मागच्या दीड वर्षात उमेदवारीला मोहिते-पाटील यांचा अंतर्गत विरोध होणार हे लक्षात येऊन माढा लोकसभेच्या सर्वच विधानसभा मतदार संघात नाईक-निंबाळकर यांनी गोळाबेरजेच्या राजकारणाचे डाव टाकले. आमदार शहाजी पाटील, आमदार संजयमामा शिंदे, आमदार बबनराव शिंदे, आमदार जयकुमार गोरे या चार आमदारांचे समर्थन मिळविले. त्यामुळे त्यांच्या दुसऱ्या इनिंगच्या उमेदवारीचा मार्ग सुकर झाला. विशेष म्हणजे मोहिते-पाटील समर्थक उमेदवारीचा अट्टहास करीत होते. त्यांनी त्यासाठी रान पेटविले होते. तरीपण नाईक-निंबाळकर यांनी संयमी भूमिका ठेवली. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी तर माढा मतदार संघात दोन वेळा येऊन नाईक-निंबाळकर यांनाच दुसऱ्यांदा उमेदवारी (पान ७ वर)

### सोलापूरच्या उमेदवारीचे काय?

भाजपाने लोकसभेसाठीची दुसरी यादी आज जाहीर केली. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील माढ्याची उमदेवारी घोषित केली. मात्र, सोलापूरच्या उमेदवाराचे नाव त्यामध्ये नाही. प्रणिती शिंदे यांना भाजपा प्रवेश देऊन त्यांना उमदेवारी देण्याचा विचार अजून भाजपाने सोडलेला नाही की प्रणिती यांच्या तुलनेत या पक्षातील श्रेष्ठींना सक्षम उमेदवार अजून दिसत नाही. याबद्दल मतमतांतरे आहेत. मात्र, सोलापूरच्या लोकसभा उमदेवाराबद्दल अजून मोठे औत्सक्य वाढले आहे.

### तुम्ही सांगाल ते धोरण, बांधाल ते तोरण

मोहिते-पाटील यांना उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांचे समर्थक प्रचंड मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर व्यक्त होत आहेत. ‘भैयासाहेब तुम्ही सांगाल ते धोरण, बांधाल ते तोरण, आता वेळ ताकद दाखविण्याची, माघार नाहीच, मोहिते-पाटील बस नामी ही काफी है, आता बदल हवा खासदार नवा, मैदान सोडले नाही’ अशा आशयाच्या पोस्ट सोशल मीडियाच्या साइटस्वर व्हायरल केल्या जात होत्या.

## ‘त्या’ २४ गावांचा संपणार ५० वर्षाचा दुष्काळी संघर्ष; बहुचर्चित मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला अखेर मंजूरी

▸ उपमुख्यमंत्री फडणवीसांना दिलेला पाळला शब्द ▸ आमदार आवताडेंच्या मागणीला यश ▸ ६९८ कोटी रुपयांची तरतूद

**मंगळवेढा/प्रतिनिधी**





मंगळवेढा तालुक्यातील ‘त्या’ २४ गावांचा मागच्या साधारण ५० वर्षांपासून अविरतपणे सुरु असलेला दुष्काळी संघर्ष आता संपणार आहे. पिढ्यान पिढ्या दुष्काळाचे चटके सहन केलेल्या त्या संबंधीत गावांच्या शिवरांमध्ये हरितक्रातींची तर लाभधारक शेतकऱ्यांच्या घरात समृध्दीची पहाट उगवणार आहे. त्याला कारणदेखील तसेच आहे. बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षेतील मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला अखेर राज्य (पान ७ वर)

**प्रणिती शिंदेंच्या पाठपुराव्याचे देखील यश :** लोकसभेच्या काँग्रेसच्या संभाव्य उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनीदेखील मंगळवेढ्यातील ‘त्या’ २४ गावच्या पाण्याच्या प्रश्नाला हात घातला होता. राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या योजनेचा मुद्दा मांडत या योजनेचा मंजूरी देण्याची मागणी केलीह होती. शिवाय मंत्रालय स्तरावरदेखील पाठपुरावा चालू ठेवला होता. या संबंधित गावांपैंकी काही गावांना भेटी देऊन पाणी प्रश्न मिटवू असे आश्वासन दिले. त्यांच्या पाठपुराव्याला यश आल्याचा दावा करण्यात आला.

**१७१७८ हेक्टर दुष्काळी क्षेत्र सिंचनाखाली :** या गावांना भीमा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून ९५ किलोमीटर मधून पोहच कालव्याद्वारे योजनेसाठी आवश्यक २.०४ अघफु (५७.७६४ दलघमी) पाणी उचलून बंदिस्त नलिका प्रणाली द्वारे मंगळवेढा उपसा सिंचन योजनेतील २४ गावांच्या शिवारातील शेतीला पाणी मिळण्याची योजना आहे. १७१७८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. ३५ गावांना फायदा होईल.

## भाजपाच्या उमेदवारांमुळे विरोधकांना धक्का

**सोलापूर/प्रतिनिधी**



महायुतीतील जागावाटपाची धुसपूस सुरू असतानाच भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रातील २० उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यात माढ्यातून रणजितसिंह नाईक निंनाळकर यांची उमेदवारी निश्‍चित केली.. तर नागपूरमधून नितीन गडकरी आणि बीडमधून पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. एकनाथ खडसे यांच्या सून रक्षा खडसे यांना रावेर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

अशोक चव्हाण यांचे राजकिय प्रतिस्पर्धी प्रतापराव चिखलीकर यांना नांदेडमधून तर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूरमधून मैदानात उतरवण्यात आले आहे. पुण्यातून माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे तेथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काय भूमिका गेणार याकडे लक्ष लागले आहे.

देशातील रस्ते विकास खात्याचा कार्यभार अत्यंत सक्षमपणे सांभाळनारे नितीन गडकरी यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांची उमेदवारी कापून त्यांना मागरदर्सक मंडळात पाटवले जाईल, अशी अटकळ बराजकिय निरीक्षकांकडून व्यक्त करण्यात येत होती. तर धनंजय मुंडे (पान ७ वर

# राजकारणामधली सभ्यताच संपली, सत्तेसाठी वाटेल ते करण्याची भाजपाची तयारी





पहिले मानकरी देशाचे नेते सुशीलकुमार शिंदे

**मिथिलेश जोशी, शिवाजी भोसले/सोलापूर**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचाराचा होणाऱ्या अतिरेकाचं जनतेला अजीर्ण झाले आहे. देशापुढील महत्त्वाच्या प्रश्नांकडे केला जाणाऱ्या काणाडोळ्यामुळे जनतेत परिवर्तनाचे वारे वहात असल्याचे मत देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले. दैनिक ‘सुराज्य’ला सुशीलकुमार शिंदे यांनी विशेष मुलाखत दिली. त्यात देशातील परिस्थिती, देशात भाजपावाल्यांनी ठेवले नसलेले सभ्यतेचे राजकारण, सोलापूर मतदार संघातील राजकीय स्थिती आणि सोलापूरचा विकास या अनुषंगाने, अनेक विषयावर भाष्य केले.**

- **मोदींच्या प्रचाराचा अतिरेक जनतेला अजीर्ण करणारा**
- **भाजपाचं ध्रुवीकरणाचं राजकारण धर्मनिरपेक्षतेला नख लावणारं!**

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



यादीची वाट बघायची, अजून काय?

कल्याण
580-39-225
मुंबई
700-71-669

देशातील आजची राजकिय स्थिती ही प्रमोद महाजन यांच्या इंडिया शायनिंग या घोषणेच्या सारखी आहे. त्यावेळीही त्यांच्या आक्रमक प्रचाराने काँग्रेसमधील काही नेते मंडळी धास्तावली होती. पण त्यानंतर काँग्रेस विजयी झाली होती. आज ग्रामीण भागात मी फिरतो तेंव्हा लोकांमध्ये भाजपा सरकारच्या कारभाराविषयी प्रचंड नाराजी असल्याचे दिसते, असे ते म्हणाले.

देशात नरेंद्र मोदी यांची प्रतिमा ठसविण्याचा अतिरेक सुरू आहे. लोकांना हा प्रपोगंडा आवडत नाही. त्यामुळे लोकांच्यात नाराजीची भावना निर्माण होते. लोकांना अतिप्रचाराचे अपचन होत आहे, असाही मुद्दा त्यांनी अधोरेखित केला.

भारतीय जनता पक्षाची सत्तेसाठी महत्त्वाकांक्षा वाढली आहे. सत्तेसाठी ते कोणत्याही स्तराला जाण्याच्या मानसिकतेत आहे. त्यातूनच देशभरातील पक्ष फोडण्याचे काम त्यांनी चालू ठेवले आहे. त्यांना विरोधकच नको, ही त्यांची भूमिका आहे. पण हा देश संविधानानुसार चालणारा देश आहे. त्याला बाधा आणण्याचे सुरू असणारे काम थांबवायलाच हवे. त्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत, असा आग्रह त्यांनी सर्व प्रसारमाध्यमांकडे धरला.

देशातील बदलत्या राजकिय परिस्थितीबाबत पत्रकारांनी अभ्यासपूर्ण आणि विश्लेषणात्मक मांडणी करण्याची गरज आहे. जर सर्व वर्तमानपत्रांनी अशी मांडणी केली तर देशात क्रांती होईल. मात्र माध्यमांवरही आता अघोषित बंधने आहेत, याकडेही माजी केंद्रीय गृहमंत्र्यांनी आवर्जून लक्ष वेधले.

धर्मनिरपेक्षता हा या देशाचा आत्मा आहे. अनेक राजे आले त्यांच्या राजवटी आल्या पण धर्मनिरपेक्षतेच्या सिद्धांताला कोठेही बाधा आली नाही. मात्र सध्याच्या ध्रुवीकरणाच्या राजकारणात त्या मूलभूत सिद्धांताला नख लावण्याचे काम केले जात आहे, देशासाठी, लोकशाहीसाठी हे चांगले नाही, याची किंमत देशाला मोजावी लागेल, अशी चिंताही शिंदे यांनी शेवटी संवादावेळी व्यक्त केली.



### ...म्हणून हव्यहव्या वाटतात भाजपावाल्यांना प्रणिती!



सोलापुरातील काँग्रेस संपवायची, यासाठी प्रणिती शिंदे यांना भाजपात घ्यायचा असा होरा भाजपवाल्यांचा अजिबात नाही. सर्वच आघाड्यांवरचा प्रणिती यांचा नेतृत्वाचा प्रवास बघता भाजपासाठी हे नेतृत्व महाराष्ट्रच नव्हे, तर देशपातळीवरचं अत्यंत उजवं होऊ शकतं. शिवाय दलितांमध्ये त्यातही महिलांमध्ये एवढं सक्षम युवा नेतृत्व नाही. भाजपासोबत हे नेतृत्व आल्यास अनेक आघड्यांवर खूप काही चांगलं होऊ शकतं असा विश्वास भाजपावाल्यांना आहे. म्हणूनच प्रणिती शिंदे यांना भाजपात घेण्याची या पक्षातील जाणकरांची धडपड आहे, असं सुशीलकुमार प्रणितींच्या भाजपा प्रवेशाच्या प्रश्नावर सांगत होते. प्रणिती शिंदे या निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत. त्यांना करिअर उत्तम कळतं. तेव्हा कोणत्या पक्षात राहावं? कोठे जावं?याबाबत त्या निर्णय घेऊ शकतात, असेही त्यांनी यावेळी पुन्हा एकदा सांगून टाकले.

### ...प्रणितीताईंकडं अजून काय हवं?



राजकीय वारसदार कन्या प्रणिती शिंदे यांचे राजकीय करिअर आणि व्यक्तीमत्वाबद्दल सुशीलकुमार शिंदे यांनी संवादादरम्यान भरभरून तोंडभरून प्रशंसा केली. केवळ राज्य नव्हे तर देश पातळीवरील राजकारण करताना जी गुणवैशिष्टये असावी लागतात ते प्रणितींमध्ये ओतपोत भरल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. पक्षीय पातळीवर किंवा संसदेमध्ये नेतृत्वाची छाप पाडताना हिंदी, इंग्रजी या भाषांवर प्रचंड प्रभूत्व हवे. ज्या विषय मांडायचे आहेत, त्याचा सखोल अभ्यास तर हवाच हवा पण संसदेत ते मांडताना धाडसाने आणि नेमकेपणाने मांडायला यायला हवेत. नेतृत्व आणि वक्तृत्वाची छाप पडायला हवी. या सगळ्या आघाड्यांवर कन्या प्रणिती टॉपर असल्याचे ते सांगत होते. प्रणितींची वाटचाल अधिक ब्राईटनेस असेल असा आत्मविश्वासदेखील त्यांनी बोलून दाखविला.

### ‘हे’देखील सुशीलकुमारांनी सांगून टाकले...

- अ‍ॅड. शरद बनसोडे आणि डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य या निष्क्रीय खासदरांमुळे सोलापूर लोकसभा मतदार संघ दहा वर्षे गेला मागे
- खासदारांच्या निष्क्रीयतेमुळे सोलापूर मागे राहात आहे, हे उघड्या डोळ्यांनी भाजपावाले बघत होते तरीही त्यांना काही देणेघेणे नसावे, स्वत:च्या सोईचे, तडजोडीचे राजकारण त्यांना महत्वाचे होते
- विकासाचे काय घेऊन बसलात, सोलापूरची नाचक्की महाराष्ट्रासह देशपातळीवर सध्याच्या खासदारांमुळे झाली
- सोलापुरातील तयार होणारे कापड हे सैनिकांसाठी चालणारे नव्हेतच, इथल्या लोकांना खुष करण्यासाठी, मतांसाठी प्रधानमंत्री मोंदींनी ढाक हाणली, सैनिकांच्या ड्रेस निर्मितीसाठी सोलापूरच्या कपड्याबद्दल आश्वासन देणाऱ्या मोदींनी सोलापूर दौऱ्यात या विषयाला स्पर्शसुद्धा नाही केला
- बीएसएफ, बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळ, दूहेरी समांतर जलवाहिनी आदी मी आणलेले हे सगळे प्रकल्प जणू सत्ताधारी भाजपावाल्यांनी बासनात गुंडाळले
- प्रणितींचे नेतृत्व सोलापूर लोकसभेसाठी अत्यंत आशवासक आहे, नागरिकांनी या नेतृत्वाला बळ देण्याबद्दल मी सर्वांना सांगतोय, सोलापूरच्या विकासासाठी प्रणितींचेच नेतृत्व सक्षम आहे.
- आपण आणलेल्या एनटीपीसी पॉवरग्रीडसह सर्वच प्रकल्पांचे सोलापूरकरांना फायदेच झाले, सत्ताधाऱ्यांनी आणलेले प्रकल्प कोणते आणि त्याचे सोलापूरकरांना फायदे काय झाले?